नियमित दिवाणी दावा क्र.१७०/२०२०
पोटे वि. घोळवे

## <u>निशाणी क्र.०५ खालील एकतर्फा आदेश</u>

**वाद मिळकत –**

मौजे वांगी हद्दीतील गट क्र.१९९/१/अ आणि १९९/१/ब/१ या वाद मिळकती आहेत.

**वादी यांचे कथन –**

वाद मिळकत मूलतः वादी आणि प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या मालकीच्या मिळकती आहेत. प्रतिवादी प्रस्तुत मिळकत विक्री करण्याच्या विचारात आहेत. वादी यांना प्रस्तुत वाद मिळकत खरेदी करण्याचा अधिकार हिंदु वारसा अधिनियम कलम २२ प्रमाणे प्राप्त झालेला आहे. मात्र प्रतिवादी यांनी प्रस्तुत वाद मिळकत विक्री केल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांच्या विरूध्द पुढील तारखेपर्यंत वाद मिळकत विक्री करू नये म्हणून तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश दयावा, अशी विनंती केली आहे.

दावा, सोबत दाखल कागदपत्रे आणि वादी यांचे कथन यांचे अवलोकन केले. प्रथमदर्शनी वादी आणि प्रतिवादी हे मूळ पुरूष कृष्णा यांचे वारस आहेत. मात्र वादी यांनी प्रतिवादी हे वाद मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत या संदर्भातील लेखी करार दाखल केला नाही. सबब, प्रस्तुत परिस्थिती पाहता प्रतिवादी यांच्याविरूध्द खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी किंवा त्यांच्यातर्फे कोणीही इतर इसम यांनी वाद मिळकत विक्री करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद का देण्यात येवू नये यासाठी त्यांचे म्हणणे मागवण्यात येत आहे.

२. वादी यांना विशेष बेलीफ भत्ता भरण्याची सुविधा उपलब्ध राहिल.

करमाळा

दिनांक – २८.०९.२०२०

(संग्राम सु.जाधव)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

करमाळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | Labade N.B., Steno. (L.G.) |
| b) | Court | : | Shri. Sangram S. Jadhav,<br>Jt. Civil Judge J.D. & J.M.F.C.,<br>Karmala, Dist. Solapur. |
| c) | Date of Judgment/Order | : | 28.09.2020 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 28.09.2020 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 28.09.2020 |